Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)with CGPA3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठातील वेतन अनुदान योजनेखालील वर्ग ४ मधील सर्व सेवकांना कळविण्यात येते की, जे सेवक सामान्य प्रशासन विभागाचे दि.०६/०६/२०१७ व दि.११/०६/२०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार खाली नमूद शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेले वर्ग-४ मधील जे सेवक वर्ग-३ मधील कनिष्ठ सहायक पदावर काम करण्यास इच्छूक आहेत, अशा सेवकांची सेवाजेष्ठता यादी तयार करण्याच्या अनुषंगाने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.06/06/2017 रोजीच्या अधीसूचनेमध्ये वर्ग 4 मधून वर्ग 3 मध्ये पदोन्नती देण्यासाठी खालीलप्रमाणे तरतूद नमूद केली आहे.

**3. बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील लिपीक-टंकलेखक, गट-क या पदावरील नियुक्ती पुढील मार्गाने करण्यात येईल**

**(क) गट-ड मधील पद धारण करणाऱ्या व गट-ड मधील पदावर किमान तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व खंड (ख) च्या उपखंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने**

**(दोन) ज्यांनी पदवी धारण केलेली आहे आणि**

**(तीन) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान 30 शब्द प्रति मिनीट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखानाचे किमान 40 शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे.**

तथापि, मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र दोन वर्षाच्या परीविक्षाधीन कालावधीमध्ये सादर करण्याबाबतचे हमीपत्र घेऊन वर्ग ४ मधून वर्ग ३ मधील कनिष्ठ सहायक पदाच्या पदोन्नतीसाठी पात्र ठरविण्यास शासन मान्यतेच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येईल. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१०/०५/२००५ रोजीच्या परिपत्रकान्वये संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्यास २ वर्षाची मुदत वाढ देण्यात आली आहे. जे सेवक उपरोक्तची शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत नाहीत त्यांना त्यांच्या मूळ पदावर पदावनत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

0 9 FEB 2024

सबब, जे सेवक कनिष्ठ सहाय्यक पदावर काम करण्यास इच्छुक आहेत त्यांनी **दि.----/---/२०२४** अखेर कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात अर्ज सादर करावेत. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे जोडण्यात यावीत. जे सेवक मुदतीत अर्ज सादर करणार नाहीत त्यांचा जेष्ठता यादीसाठी विचार केला जाणार नाही, याची संबंधित सेवकांनी

नोंद घ्यावी. तसेच ज्या कर्मचाऱ्यांनी सदरचे परिपत्रक प्रसिध्द होण्याच्या अगोदर कनिष्ठ सहायक पदाच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये नाव समाविष्ट करणेबाबतचा अर्ज कार्यालयास सादर केला आहे, त्यांनी देखील सदर परीपत्रकानुसार अर्ज करावा, अन्यथा जेष्ठता यादीसाठी विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**कुलसचिव**

**जा.क्र. आस्थापना-२ /** ९६

**दिनांक :-** 0 2 FEB 2024

**प्रति,**

१. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक.

२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी

३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख

४. स्वीय सहाय्यक - मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, मा.कुलसचिव, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व मा. वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.

५. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**टीप :- सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व वर्ग ४ मधील सेवकांच्या निदर्शनास आणावे.**